नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२० Issue - 120 | वार बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५ Blow- Wednesday Date 17 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यांत लाखो हेक्टर शेती पाण्यात

## ऑगस्ट–सप्टेंबरमध्ये महाराष्ट्रात पावसाचे थैमान; कृषिमंत्री दत्ता भरणेंची माहिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरु आहेत. अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने या परिस्थितीचा सामना करावा, राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यात अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत. राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

बाधित पिके: सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, राज्य सरकार त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळेल. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये, योग्य मार्गदर्शन घेऊन आपली शेती सुधारण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे. ऑगस्ट–सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानामुळे शेतकरी आणि राज्यासाठी मोठा आव्हान उभा राहिला आहे. मात्र, योग्य वेळेत नुकसानभरपाई, मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होण्याची शक्यता आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता राज्य सरकारला मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र, ही मुदत आता संपत आली असूनही एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पार पडली नाही. यासंदर्भात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने राज्य सरकारला निवडणूक प्रक्रियेतील विलंबाविषयी जाब विचारला. तेव्हा राज्य सरकारने आपली बाजू मांडली असता न्यायालयाने आता राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता ३१ जानेवारीपर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेऊन त्यांचा निकालही जाहीर करावा लागेल. या निर्णयामुळे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.



## सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश

यापूर्वी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश दिला होता. ही मुदत आता संपत आल्याने राज्य सरकारने पुन्हा मुदत वाढवून मागितली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने आम्ही दिलेल्या चार महिन्यांच्या मुदतीत निवडणुका का घेतल्या नाहीत, असा जाब राज्य सरकारला विचारला. तसेच आता सप्टेंबर ते डिसेंबर इतका कालावधी तुम्हाला कशासाठी हवा आहे, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. यावर राज्य सरकारने आपली बाजू मांडताना कर्मचाऱ्यांची कमतरता आणि सणांचे कारण पुढे केले. आमच्याकडे ईव्हीएम यंत्रे ही नोव्हेंबर महिन्यात उपलब्ध होणार आहेत. याशिवाय, सध्या प्रभाग रचनेचे काम सुरु आहे. ही प्रक्रिया मोठी असल्याने ती पूर्ण होण्यासाठी वेळ लागत आहे. त्यामुळे आम्हाला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाने केली होती.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदत वाढवून मागितली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंतची नवी मुदत ठरवून दिली. त्यानुसार आता ठरवलेल्या वेळेत काम संपवा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

# तुम्ही ब्रँड नाही, बाळासाहेब होते, आमच्याकडे जगातील सर्वात मोठा ब्रँड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत काही लोक म्हणत होते की त्यांच्याकडे ब्रँड आहे, पण आमच्या प्रसाद लाड आणि शशांक राव यांनी त्यांच्या ब्रँडचा बँड वाजवला. बाळासाहेब ठाकरे हे खरे ब्रँड होते, तुम्ही नाहीत अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर केली. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड झाला, नरेंद्र मोदी हा जगातला सर्वात मोठा ब्रँड आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईतील भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत होते.

अमित साटम यांनी ब्राह्मोस मिसाईल सारखा विरोधकांवर हल्ला चढविला. आपल्याला कोणी आता थांबवू शकत नाही. मागच्या वेळी थोडक्याने वाचलो होतो, दोनच नगरसेवक कमी पडले होते. आपल्याला माहिती आहे की कमी पडल्यावर काय करायचे ते.





त्यामुळे यावेळी मुंबई महापालिकेमध्ये महायुतीच जिंकणार, महापौर महायुतीचाच असणार असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

गेल्या वेळी शिवसेनेचा महापौर व्हावा अशी उद्धवजी यांची इच्छा होती. आपण क्षणाचाही विलंब लावला नाही. आपण सगळ्यांना बोलवले, तेव्हा एक पाऊल मागे घेऊन त्यांना महापौर दिलं. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष सगळे तुम्ही घ्या. आम्ही विरोधक म्हणून काम करणार नाही, पण जर तुम्ही कुठे चुकला तर आम्ही अंकुश ठेऊ असं सांगितलं. पण २०१९ ची निवडणूक आली आणि

## मुंबईत महायुतीचा महापौर होणार : देवेंद्र फडणवीस

मग मला गाणे गावे लागले 'अछा सिला दिया तूने मेरे प्यार का, यार ने ही लूट लिया घर यार का'.

आम्ही लढणारे आहोत रडणारे नाही. २०२२ ला आम्ही गनिमी कावा दाखविला आणि २०२४ ला आम्ही पूर्ण बहुमताचे सरकार आणले. काहीही झाले तरी, कोणी सोबत आले तरी आणि कोणी सोबत आले नाही तरी मुंबईत महायुतीचा झेंडा लागल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ठाकरे बंधूंवर टीका केली. ते म्हणाले की, साधी बेस्टची निवडणूक होती. आम्ही म्हणालो कशाला पक्षावर लढायचं. तर ते म्हणाले आमचा ब्रँड आहे. आमचे शंशाक राव आणि प्रसाद लाड, दरेकर यांनी या ब्रँडचा बँड वाजवला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ब्रँड आहे, तुम्ही ब्रँड नाही.

आमच्याकडे अमित साटम सारखा सामान्य कार्यकर्ता अध्यक्ष होतो. आमच्याकडे चहा विकणारा जागतिक ब्रँड झाला. नरेंद्र मोदी नावाचा जगातील सर्वात मोठा ब्रँड आमच्याकडे आहे.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक; सोलापूर जिल्ह्याच्या कर्नाटक सीमेजवळील नांदणी चेक पोस्ट चा अहवाल सादर करा

# राज्यातील परिवहन विभागाचे सर्व चेक पोस्ट बंद करण्याबाबत धोरणात्मक निर्णय लवकरच होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अतिवृष्टीने झालेल्या शेती पीक व घरांचे नुकसानीचे पंचनामे त्वरित करून शेतकऱ्यांना व नागरिकांना लवकर मदत मिळेल याबाबत दक्षता

सोलापूर ते मुंबई विमान सेवा लवकरच सुरू होण्याच्या दृष्टीने विमानतळ प्राधिकरणने प्रयत्न करावे

सोलापूर, दिनांक १६(जिमाका):-कायद्याच्या कक्षेत बसून सर्वसामान्य वाहनचालकांना चेक पोस्टवर विनाकारण त्रास दिला जात आहे. तसेच या ठिकाणी अनेक चुकीच्या गोष्टी घडत असल्याने त्यास पायबंद घालण्यासाठी शासन नवीन धोरण आखत आहे. त्या अनुषंगाने आंतरराज्य सीमावर असलेले परिवहन विभागाचे सर्व चेक पोस्ट बंद करण्याबाबत शासन लवकरच निर्णय घेणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात आयोजित शासकीय विभाग प्रमुख व पदाधिकारी यांच्या आढावा बैठकीत परिवहन मंत्री सरनाईक मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजल्हाधिकारी अभिजीत पाटील, सोलापूर विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापक चंद्रेश वंजारा, सहव्यवस्थापक अंजनी शर्मा, माजी राज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अमोल शिंदे, रमेश बारसकर यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक पुढे म्हणाले की, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीतील नांदणी येथील चेक पोस्टला आपण स्वतः भेट दिलेली असून त्या चेक पोस्ट वरून रोज किती गाड्या पास होतात तसेच अतिरिक्त भार असलेल्या किती गाड्यावर कारवाई केली याचा सविस्तर अहवाल लेखी स्वरूपात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना सादर करण्याबाबत त्यांनी निर्देशित केले.

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या शेती पिकांचे नुकसानीचे पंचनामे प्रशासकीय स्तरावर सुरू आहेत. यातून एकही शेतकरी वंचित राहणार नाही या दृष्टीने प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे. तसेच अतिवृष्टीने सोलापूर शहरातील अनेक भागात नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरलेले होते त्याचेही पंचनामे करावेत व असे नागरिक शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाहीत या दृष्टीने प्रयत्न करावेत अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

विमानतळ प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाने सोलापूर येथून मुंबईसाठी विमान सेवा लवकरच सुरू होईल या दृष्टीने संबंधित विमान कंपनीकडे पाठपुरावा करावा. तसेच सोलापूर विमानतळ येथे नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विमानतळ प्राधिकरणाने प्रयत्न केले पाहिजेत, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी देऊन कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या अनुषंगाने शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन जिल्हा प्रशासनाने करावे, असेही त्यांनी सांगितले.

कामगार विभागाच्या वतीने सर्वसामान्य व गोरगरीब कामगारांना विविध योजनांचा लाभ दिला जातो परंतु या विभागाकडे बऱ्याच तक्रारी येत असून जिल्हाधिकारी यांनी स्वतः या दृष्टीने स्वतंत्र बैठक घेऊन विना तक्रार जिल्ह्यातील सर्व कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या अनुषंगाने काटेकोरपणे नियोजन करावे. तसेच मंद्रूप, दुधनी व बोरामणी येथे राज्य परिवहन महामंडळाचे बस स्थानक होण्यासाठी आवश्यक जागेची उपलब्धता महसूल प्रशासनाकडून व्हावी. एस.टी. महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी उपरोक्त ठिकाणी भेटी देऊन जागा पाहणी करावी व सदरची जागा महसूल प्रशासनाकडून मिळण्याबाबत पाठपुरावा करावा. तसेच सोलापूर येथील एसटी महामंडळाचे वर्कशॉप एमआयडीसी येथील नवीन जागी लवकरात लवकर सुरू करावे,



असेही निर्देश परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी १० सप्टेंबर २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची माहिती दिली. तसेच पंचनामे कार्यवाही पूर्ण होत असून त्याचा सविस्तर प्रस्ताव शासनाला पाठवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी विषय सूचीनुसार विषयांची माहिती दिली.

बैठकीत पदाधिकाऱ्यांनी मांडलेले विषय व सूचना...

*सहाय्यक आयुक्त कामगार कार्यालयात कामगारांसाठी असलेल्या योजनांचा लाभ दिला जात नाही तसेच कागदपत्रांसाठी विनाकारण त्रास दिला जातो त्या अनुषंगाने संबंधितावर कार्यवाही करून कामगारांना योजनांचा लाभ द्यावा.

*मंद्रूप ग्रामपंचायत ही दक्षिण सोलापूर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून लोकसंख्या २०००० पेक्षा अधिक आहे. तरी या ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा द्यावा तसेच या ठिकाणी एसटी महामंडळाचे बस स्थानक बांधावे.

*दुधनी येथे एसटी महामंडळाचे बस स्थानक निर्माण करावे, बोरामणी येथे बस स्थानक निर्माण करावे, सोलापूर येथील एसटी महामंडळाचे वर्कशॉप नवीन जागेत स्थलांतरित करावे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, सोलापूर महापालिकेने सोलापूर शहराचा बृहत आराखडा केला असून तो चुकीचा आहे त्याला स्थगिती देण्याची मागणी. अतिवृष्टी मध्ये सोलापूर शहरातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरले याला महापालिके जबाबदार असून सर्व रस्ते नाल्या स्वच्छता याबाबत महापालिकेने त्वरित कार्यवाही करण्याची मागणी. टेंभुर्णी येथे अनेक खत कारखाने असून त्यात भेसळ होत असल्याचा संशय असल्याने प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी, टेंभुर्णी बस स्थानकावरील अतिक्रमणे काढण्याची मागणी, मोहोळ येथे क्रीडा संकुल उभारण्याची मागणी यासह अनेक विविध मागण्या व सूचना पदाधिकारी यांनी मंत्री महोदय व प्रशासनाकडे केल्या.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### राज्य सरकारला मुदतवाढ

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता राज्य सरकारला मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र, ही मुदत आता संपत आली असूनही एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पार पडली नाही. यासंदर्भात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने राज्य सरकारला निवडणूक प्रक्रियेतील विलंबाविषयी जाब विचारला. तेव्हा राज्य सरकारने आपली बाजू मांडली असता न्यायालयाने आता राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता ३१ जानेवारीपर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेऊन त्यांचा निकालही जाहीर करावा लागेल. या निर्णयामुळे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश दिला होता. ही मुदत आता संपत आल्याने राज्य सरकारने पुन्हा मुदत वाढवून मागितली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने आम्ही दिलेल्या चार महिन्यांच्या मुदतीत निवडणुका का घेतल्या नाहीत, असा जाब राज्य सरकारला विचारला.

# उज्वल जीवनासाठी ओझोन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(१६ सप्टेंबर –जागतिक ओझोन दिन)**

जगाची वाढलेली लोकसंख्या, त्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेले अनेक प्रश्न त्यात हवामान, पर्यावरण आणि आरोग्य यावर झालेला विपरीत परिणाम. प्रदूषणामध्ये झालेली मोठी वाढ त्याचा परिणाम म्हणजे ओझोन सारख्या वायूच्या थराला पडलेली छिद्रे भविष्यात जीवसृष्टीसाठी अनेक संकटे निर्माण करू शकतात.१९७० च्या उत्तरार्धात ओझोनच्या थराला छिद्र असल्याचा दावा शास्त्रज्ञाने केला होता. यानंतर ८० च्या शतकात जगभरातील अनेक देशांनी या समस्येवर विचार करण्यास सुरुवात केली. १९८५ मध्ये ओझोन थराच्या संरक्षणासाठी व्हीएन्ना अधिवेशन बोलावण्यात आले, यानंतर १९ डिसेंबर १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या जागतिक ओझोन दिवस १९९५ मध्ये साजरा करण्यात आला.

ओझोनचा थर हा ऑक्सिजनच्या तीन अणुचा समावेश असलेला वायू आहे आणि तो पृथ्वीच्या वातावरणाचा एक थर आहे, जो सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणापासून आपले संरक्षण करण्याचे काम करतो. फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ फॅब्री चार्लस आणि हेन्री भूषण यांनी १९१३ मध्ये या ओझोन वायू थराचा शोध लावला होता.



'ओझोन ' हा ग्रीक शब्द आहे ज्याचा अर्थ हुंगणे असा आहे . ओझोन मध्ये एक विशेष प्रकारचा वास आहे. हवेमध्ये आोझोनचे एकूण प्रमाण अत्यल्प आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १६ किमी या उंचीवर सूर्याचे किरण ऑक्सिजनचे रूपांतर ओझोन वायू मध्ये करतात. या उंचीपासून २३ किलोमीटर पर्यंत ओझोनचे प्रमाण वाढत जातो आणि त्या ठिकाणी ओझोनचा थर सर्वाधिक जाड थर असतो. ओझोन हा फिकट निळ्या रंगाचा वायू असून पाण्यात थोड्या प्रमाणावर विरघळतो त्याला क्लोरीन वायू सारखा वास असतो. ओझोन सूर्यापासून येणाऱ्या प्रारणातील अपायकारक अतिनिल किरण हा ओझोन वायू थर शोषून घेतो आणि पृथ्वीवरील पृथ्वीवर पोहोचण्यापासून अतिनील किरणांना थोपवतो.

विकसित देशांमध्ये वातविलेप तुषार हे प्राणोदक घातक आहे तसेच परफ्युम सारख्या प्रणोदकापासून फ्लोरोकार्बन, क्लोरोफ्लोरोकार्बन, ट्राय क्लोरोफ्लोरोप मिथेन, कार्बन टेट्राक्लोराइड, नायट्रिक ऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड, हायड्राझायल, क्लोरीन, ब्रोमीन वर उल्लेख केलेले सर्व वायू यातून ओझोन वायूचा थर कमी करण्यास कारणीभूत ठरलेले आहेत. ओझोन वायूचा थर कमी झाल्यामुळे अतिनील किरण पृथ्वीच्या पृष्ठभागावर येतात ऑस्ट्रेलियाच्या परिसरात ओझोन वायूचा काही थर नष्ट झाल्यामुळे अतिनील किरण थेट पृथ्वीवर येत आहेत त्यामुळे त्या ठिकाणी त्वचेच्या रोगात वाढत होतं आहे .अतिनील किरणाचा परिणाम त्वचेचे कर्करोग, गुणसूत्रात होणारा बदल यासारखे गंभीर आजार निर्माण करू शकतात.

दर दशकाला ओझोनचा थर ४ टक्क्याने कमी होत आहे असे तज्ञांचे मत आहे.

अतिनील किरणाचा प्रभाव केवळ प्राण्यांवरच होतो असं नाही तर वनस्पतीवरही याचा व्यापक स्वरूपात विपरीत परिणाम होत आहे. काही महत्त्वाची पिके जसे गहू, मका आणि सोयाबीन या किरणांनी खूप प्रभावित होतात. एका मोठ्या अनुमानानुसार ओझोन मध्ये १ टक्का –हास होण्याने पिकाच्या उत्पादनात १ ते २ टक्के घट होते. वर उल्लेख केलेले दुष्परिणाम आजच्या स्थितीला कमी वाटेल तरीही भविष्यात फार मोठा धोका उद्भवू शकतो.

ओझोन वायूचा थर कमी होऊन धोके निर्माण होऊ नयेत. म्हणून यावर उपाययोजना सांगताना पर्यावरण नियंत्रणाची स्वतःची संशोधन पद्धती विकसित करण्याच्या हालचाली पाश्चात्य देशात जोराने वाढल्या आहेत. ही पद्धत खर्चिक असल्यामुळे विकसनशील देशाला परवडणारी नाही.

ओझोन वायूचा थर नष्ट होऊ काही उपाय.

१) ओझोन वायूच्या थराला नुकसान होऊ नये म्हणून वर उल्लेख केलेल्या रासायनिक घटकाचा कमीत कमी वापर पर्यावरणातील अनेक गोष्टीचा पुनर्वापर करणे आणि पुन्हा उपयोगात आणणे.

२)ओझोन वायूला हानिकारक ठरणाऱ्या वायूचे प्रदूषण कसे कमी करता येईल याची काळजी घेणे

३) हरित ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल याची काळजी घेणे त्यामध्ये सोलार पॅनल वाऱ्यापासून वीज निर्मिती पाण्यापासून वीजनिर्मिती याचा वापर मोठ्या प्रमाणावर केल्यास ओझोन वायू सुरक्षित राहू शकतो.

४) जास्तीत जास्त झाडे लावून, त्याची वाढ करून हरित पट्टे तयार केल्यास निश्चितच ओझोन वायूचा थर सुरक्षित राहू शकतो. यासाठी सामाजिक संस्था, संघटना, शाळा व महाविद्यालय यासारख्या अनेक स्तरातून ओझोन संरक्षण चळवळ उभी राहिली पाहिजे. तर ओझोन वायूचे संरक्षण होऊ शकते.

**लेखन**
**करपे पी.आर.**
**(पर्यवेक्षक : लो.शं.बा.वाजे. वि.सिन्नर.) ९८२२८१३१७५**

# परिवर्तन सामाजिक संस्था : ग्रामीण भागातील आशेचा किरण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजच्या धावपळीच्या युगात समाजातील वंचित घटकांच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. पण धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथे कार्यरत असलेली परिवर्तन सामाजिक संस्था मात्र गेली एकोणतीस वर्षे खऱ्या अर्थाने वंचित, गरीब, शेतकरी, महिला आणि युवकांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी झटत आहे. शाश्वत विकासासाठी एकत्र येऊया हे ब्रीदवाक्य घेऊन संस्थेने आजवर समाज विकास अनेक महत्वपूर्ण कामगिरी केली आहे.

**ध्येय : उज्ज्वल भविष्याची वाट**

परिवर्तन सामाजिक संस्थेचे ध्येय स्पष्ट आहे – विद्यार्थी, युवक, महिला आणि शेतकरी यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक ग्राम विकास करणे. संस्था महिलांना केवळ आर्थिकदृष्ट्या सबळ बनवते असे नाही, तर त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेत गावपातळीवर नवे नेतृत्व घडवते.

जिद्दीने उभारलेले कार्य

या संस्थेने उभारलेले कार्य आज अनेकांसाठी प्रेरणादायी आहे –

बालपोतराज मुक्ती अभियान* – रूढी–परंपरेच्या नावाखाली मुलांचे आयुष्य अंधारात जाण्यापासून १५२ मुलांना वाचवले. आज हेच मुले शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

महिला बचत गट चळवळ* – १५० हून अधिक महिला बचत गटांच्या माध्यमातून हजारो महिलांना स्वाभिमानाने जगता येऊ लागले. घर चालवणारी हीच स्त्री आता स्वतःचा व्यवसाय चालवत आहे. प्रत्येक निर्णय प्रक्रियेत सहभागी असते.

पंचायत राज नेतृत्व* – पंचायत राज यंत्रणेच्या उद्देशाने ४०० महिलांना नेतृत्व कौशल्य विकसित केले आणि त्यातील १० महिला ग्रामपंचायत सदस्य बनल्या. गावाच्या प्रश्नांवर आता त्या स्वतः आवाज उठवतात.

पर्यावरण संवर्धन* – वृक्षलागवड, पाणी संवर्धन आणि सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून संस्था शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या संकटाशी सामना करण्याची ताकद देत आहे.

जल व्यवस्थापन* – टँकरवर अवलंबून असलेल्या गावांना जलस्वराज्य प्रकल्पाद्वारे शुद्ध पाणी मिळाले. १३,५०० नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटला.

*लैंगिक शोषणविरोधी अभियान* – ५ गावांतील ११८० नागरिकांना आपणही बदल घडवू शकतो अशी जाणीव देत सुरक्षित वातावरण निर्माण केले.

भविष्यातील आशा

परिवर्तन सामाजिक संस्था पुढील काळात विधवा, निराधार व गरजू महिलांसाठी *शेळीपालन, लघुउद्योग व स्वयंरोजगार प्रशिक्षण* सुरू करत आहे. तसेच पर्यावरणपूरक शेती, तंत्रज्ञानाधारित उपाययोजना आणि युवकांना रोजगाराच्या संधी यावर भर दिला जाणार आहे.

संस्था मानते – **खरा बदल ,तेव्हाच घडतो जेव्हा गावातील सामान्य माणूस स्वतःच्या पायावर उभा राहतो. परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम गेली २५ वर्ष आयोजित करीत असतो. यामुळे समाजात निरपेक्ष भावनेने जे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतात त्यांचा सन्मान करतो त्यांची प्रेरणा घेऊन अन्य लोक ही काम करतील असे वाटते

गौरवाची नोंद

संस्थेच्या या प्रामाणिक प्रयत्नांची दखल अनेकांनी घेतली आहे.

₹द्व नेहरू युवा संस्था पुरस्कार (२००२)

₹द्व उत्कृष्ट संस्थात्मक लोकशाही मित्र पुरस्कार (२०२४)

हे पुरस्कार केवळ कागदावरील सन्मान नाहीत, तर संस्थेच्या वाटचालीतील प्रत्येक स्वयंसेवकाच्या कष्टांचे कौतुक आहे.

समाजासाठी आवाहन

आज ग्रामीण भाग बदलण्याची ताकद *आपल्या एकत्रित सहकार्यामध्ये* आहे. परिवर्तन सामाजिक संस्थेला दिलेला प्रत्येक हातभार म्हणजे –

एका मुलाचे शिक्षण

एका विधवेचे स्वावलंबन

एका शेतकऱ्याचा शाश्वत शेतीकडे प्रवास

एका गावाचे टँकरमुक्तीचे स्वप्न

**मारुती बनसोडे**
**संस्थापक सचिव परिवर्तन सामाजिक संस्था व्यंकटेश नगर, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव – ४१३६०२**
**मो. ९५९५१७१८६६ /** ९४२२७०५४६८ parivartan.naldurg1gmail.com, paivartanngo96gmail.com

## खासदार प्रणिती शिंदे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

### शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

# सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांच्या हक्कासाठी कायम लढत राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई/विजय घनघाव

मुंबई ; सोलापूर शहर व जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांना अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, अपूर्ण पायाभूत सुविधा व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भेडसावत असलेल्या गंभीर समस्यांवर तातडीने उपाययोजना व्हावी, यासाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात खासदार शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील नरखेड व सावळेश्वर महसूल मंडळातील शेतकऱ्यांची हाक ऐकवली. या मंडळांमध्ये ६५ मिमिपेक्षा कमी पावसाची नोंद झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या व घरांच्या नुकसानीचे पंचनामे झालेले नाहीत. मात्र डिकसळ, मसले चौधरी व खुनेश्वर या गावांमध्ये प्रत्यक्षात ७० ते ७५ मिमी इतका पाऊस पडूनही पंचनामे न झाल्याने शेतकऱ्यांना व नागरिकांना मदत मिळाली नाही. त्यामुळे ६५ मिमिपेक्षा कमी पावसाच्या नोंदीची अट शिथिल करून सरसकट पंचनामे करण्याची मागणी खासदार शिंदे यांनी केली.

खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात मांडलेले महत्त्वाचे मुद्दे असे :

१) अतिवृष्टीमुळे ज्यांची घरे पडझड झाली आहेत, त्यांचे पंचनामे करून तातडीने मदत द्यावी. २) ज्या मंडळात ६५ मिमिपेक्षा कमी पावसाची नोंद असली तरी प्रत्यक्षात ६५ मिमिपेक्षा जास्त पाऊस पडला आहे, अशा ठिकाणी सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी. ३) सोलापूर शहरातील स्ट्रॉम ड्रेन लाईन सुधारण्यासाठी विशेष योजना तयार करून निधी द्यावा तसेच चुकीच्या नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह पूर्ववत करावा. ४) अमृत योजनेतील त्रुटीपूर्ण ड्रेनेज लाईनमुळे पाणी साचते, ती योग्य प्रकारे दुरुस्त करावी. ५) अतिवृष्टीमुळे वाहून गेलेले रस्ते, पूल, बंधारे व बॅरॅकेट दुरुस्त करून वाहतुकीस सुरक्षित करावे. ६) अक्कलकोट तालुक्यातील शिरशी, मोटयाळ, संगोगी (बु) गावे स्थलांतरित करून पुनर्वसन करावे. ७) प्रत्येक बंधारा व पुलावर क्रॅशगार्ड बसविण्यात यावा. ८) कुरनुर धरणातून पूर्वसूचना न देता पाणी सोडल्याने गावांमध्ये झालेले मोठे नुकसान भरून काढावे. ९) संगोगी (बु) येथील बंधाऱ्याचे मोठे नुकसान दुरुस्त करावे; कारण तो शेतकऱ्यांच्या दळणवळणासाठी धोकादायक ठरत आहे. १०) शिरशीवाडी तलाव कमकुवत झाल्याने तो कधीही फुटण्याचा धोका असल्याने तातडीने दुरुस्ती करावी. ११) पीएमजीएसवाय व सीएमजीएसवाय अंतर्गत झालेले निकृष्ट दर्जाचे रस्त्यांचे कामे दुरुस्त करून दोषींवर कारवाई करावी. १२) मोदी वसाहतीतील रेशन दुकानातील तांदळात मृत साप आढळल्याने त्यावर गंभीर कार्यवाही करावी. १३) गायरान जमीन गावठाणात रूपांतरित करावी. गावठाण जमीन उपलब्ध नसेल तर गायरान जमिनीवर घरकुल बांधण्याची परवानगी द्यावी. अनेक वर्षांपासून राहात असलेल्या घरांना नियमित करावे.

तसेच सोलापूर शहरातील दरवर्षीच्या पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी तुंबण्याच्या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना व्हावी, यासाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन निवेदन सादर केले.

खासदार शिंदे म्हणाल्या की, सोलापूर शहरात केवळ तीन तासांचा जोरदार पाऊस पडला तरी महानगरपालिका यंत्रणा कोलमडून पडते. नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरते, रस्त्यावर पाणी साचते आणि संपूर्ण शहराचे जीवनमान विस्कळीत होते. खरोखरच या शहराला वाली आहे का, असा प्रश्न आज नागरिकांना पडला आहे.

त्यांनी निदर्शनास आणले की, महानगरपालिकेकडून पावसाळ्यापूर्वी योग्य नियोजन न केल्यामुळे दरवर्षी अशी भीषण परिस्थिती निर्माण होते. राज्यात व केंद्रात सत्ताधारी असतानाही नागरिकांना दिलासा मिळत नाही, ही शोकांतिका आहे.



खासदार शिंदे यांनी निवेदनात पुढील मुद्दे मांडले :

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सोलापूर महानगरपालिकेशी जोडून मलनिस्सारण वाहिनी सुयोग्य करावी. २) अस्तित्वात असलेल्या स्ट्रॉम ड्रेन लाईन अद्ययावत कराव्यात. ३) अमृत योजनेतून झालेल्या ड्रेनेज लाईन कार्यान्वित करण्यासाठी दुरुस्त कराव्यात. ४) शहरातील १९ प्रमुख नाल्यांचे खोलीकरण व रूंदीकरण करण्यासाठी हाती घेतलेला ९९ कोटींचा प्रकल्प पारदर्शकपणे तडीस न्यावा. ५) स्मार्ट सिटी अंतर्गत सिमेंट रस्त्यांवर चुकीच्या पद्धतीने कमी इंचाच्या ड्रेनेज लाईन टाकल्यामुळे निर्माण झालेल्या समस्येचे तातडीने निराकरण करावे. ६) विश्वस्त मंडळ नसल्यामुळे महानगरपालिकेवर कोणताही वचक नाही; स्थानिक खासदार–आमदारांना विश्वासात घेऊन निधीचा नियोजनबद्ध वापर व्हावा. ७) नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह जिथे बदलला आहे तो पूर्ववत करावा. ८) नाल्यांवरील अतिक्रमण दूर करून तेथील रहिवाशांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे.

शिंदे यांनी सांगितले की, मागील काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे सोलापूर शहर व लोकसभा मतदारसंघातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरले, संसार उघड्यावर आले आणि रस्ते, परिसर पाण्याखाली गेले. स्मार्ट सिटी व अमृत योजनेतील त्रुटींमुळे ही परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लोकप्रतिनिधींना पूर्णपणे दूर ठेवून निधीचा मनमानी खर्च सुरू आहे, असेही त्यांनी निदर्शनास आणले.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टीमुळे प्रचंड अडचणीत सापडले आहेत. त्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून शासनाकडून तातडीने मदत मिळत नाही. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचे संसार उघड्यावर येत आहेत. सोलापूर जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सर्वांना तातडीचे अर्थसहाय्य द्यावे आणि नुकसानभरपाईचे निर्णय त्वरीत घ्यावेत, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. खासदार शिंदे पुढे म्हणाल्या की, शेतकऱ्यांच्या समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. जर शासनाने योग्य उपाययोजना न केल्यास याचा थेट परिणाम संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या जनजीवनावर होईल.

दरम्यान, खासदार शिंदे यांनी सोलापूर शहरातील पावसाळ्यातील बिकट परिस्थितीकडेही लक्ष वेधले. केवळ काही तासांचा जोरदार पाऊस झाला तरी शहरातील नाले, ड्रेनेज लाईन व स्ट्रामड्रेन तुडुंब भरतात. घरामध्ये पाणी शिरते, रस्त्यावर पाणी साचते आणि नागरिकांचे जीवनमान धोक्यात येते. स्मार्ट सिटीच्या कामांमध्ये झालेल्या चुका, अपुऱ्या ड्रेनेज लाईन आणि अतिक्रमणांमुळे ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे. यावर शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांना आवाहन केले की, ड्रेनेज लाईन सुधारणा, नाल्यांचे जे खोलीकरण–रुंदीकरण, अतिक्रमणांचे निर्मूलन व पुनर्वसन, तसेच अमृत योजनेत झालेले कामे सुयोग्यपणे कार्यान्वित करणे, सोलापूर शहरातील ९९ कोटींचे १९ नाले रुंदीकरण व उंची वाढविण्याचा योजना महापालिकेने एकट्याने न राबविता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सोबत घेऊन राबविण्यात यावा जेणेकरून नाल्याचे रुंदीकरण व उंचीकरण योजना योग्य रित्या होईल व त्याचा फायदा सोलापूर शहरातील नागरिकांना होईल. या बाबींसाठी तातडीचे आदेश द्यावेत. अन्यथा सोलापूर शहर विकासाऐवजी समस्यांच्या विळख्यात अडकून राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, सोलापूर जिल्हा काँग्रेसचे सातलिंग शटगार, अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी, मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, मा. नगरसेवक प्रवीण निकाळजे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेश अप्पा पवार, संदीप पाटील, कार्याध्यक्ष सुशील बंदपट्टे, मिडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला, मा. नगरसेवक किरणराज घाडगे, मंगळवेढा युवक अध्यक्ष रविकिरण कोळेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी संपूर्ण आंबेडकरी बौद्ध समाजाची एकजूट मैदानात उतरणार

## येत्या १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत राणीबाग ते आझाद मैदान विराट रॅलीचे आयोजन : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांचे सर्वोच्च जागतिक श्रद्धास्थान आहे. महाकारुणिक तथागत भगवान बुद्धांना जिथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या पूर्णपणे ताब्यात नाही. ज्या कर्मकांड पिंडदानाला अंधश्रद्धेला भगवान बुद्धांनी विरोध केला ते प्रकार महाबोधी महाविहार परिसरात होत असल्याने जगभरातील बौद्धांच्या भावना दुखावल्या जात आहेत.महाबोधी महाविहार व्यवस्थापन ट्रस्ट मध्ये चार हिंदू चार बौद्ध आणि एक कलेक्टर असे सदस्य असतात..कलेक्टर जर हिंदू असेल तर ते चेअरमन असतात.

महाबोधी महाविहार पूर्णतः बौद्धांच्या ताब्यात नाही.त्यामुळे महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा १९४९ ज्याला बिटी ऍक्ट म्हटले जाते तो बी टी ऍक्ट रद्द झाला पाहिजे. भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले असून त्यापूर्वीचा १९४९ चा बिहार विधानसभेचा बिटी ऍक्ट रद्द झाला पाहिजे.महाबोधी महाविहार ट्रस्ट मधील सर्व ९ सदस्य आणि चेअरमन हे बौद्ध असले पाहिजेत.प्रत्येक धर्माचे धार्मिकस्थळ त्या त्या धर्माच्या ट्रस्ट कडे असतात. हिंदू मंदिरात हिंदू ट्रस्टी; मुस्लिमांच्या दर्गा मशीद मध्ये मुस्लिम ट्रस्टी; शिखांच्या गुरुद्वारात शीख ट्रस्टी मग बौद्धांचे बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात का नाही? बौद्धांच्या बुद्धविहार ट्रस्ट मध्ये बौद्ध ट्रस्टी का नको? महाबोधी महाविहार बौद्धांचे असून त्याचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्धांचे असले पाहिजे.महाबोधी महाविहार इतरांच्या ताब्यातून मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात द्यावे.या मागणीसाठी महाराष्ट्रातील सर्व रिपब्लिकन गट सर्व बौद्ध आंबेडकरी संघटना; सर्व पक्षीय बौद्ध नेते एकत्र आले असुन येत्या १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीसाठी भायखळा राणीबाग ते आझाद मैदान अशी मुंबईत शांततापूर्ण विराट रॅली आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीत प्रचंड संख्येने सर्व बौद्ध आंबेडकरी जनतेने ताकदीने सहभागी व्हावे असे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या एकजुटीचे निमंत्रक रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.या पत्रकार परिषदेस महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी एकत्रित आलेले विविध पक्षांचे अनेक बौद्ध नेते ; विविध रिपब्लिकन गटांचे नेते उपस्थित होते.

मुंबईत गरवारे क्लब येथे महाबोधी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी मुंबईत आयोजित करण्यात येणाऱ्या विराट रॅली चे नियोजन करण्यासाठी सर्व रिपब्लिकन गटांची सर्व बौद्ध आंबेडकरी संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत महाबोधी महाविहार मुक्ती साठी मुंबईत सर्व बौद्धांच्या एकजुटीची रॅली १४ ऑक्टोबर ला भायखळा राणी बाग ते आझाद मैदान अशी आयोजित करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. यावेळी बैठकीचे निमंत्रक ना.रामदास आठवले; प्रा.जोगेंद्र कवाडे; डॉ राजेंद्र गवई; नाना इंदिसे; खासदार चंद्रकांत हंडोरे; खासदार वर्षाताई गायकवाड; अर्जुन डांगळे; अक्षय आंबेडकर; राजू वाघमारे; जयदेव गायकवाड; अविनाश महातेकर; राम पंडागळे;भाई गिरकर ; दैनिक सम्राट चे संपादक कुणाल बबन कांबळे; तानसेन ननावरे; काकासाहेब खंबाळकर; सागर संसारे; दिलीप जगताप; सुनील निर्भवने; सुरेश केदारे; नितीन मोरे; मिलिंद सुर्वे; विलास रूपवते ; रवी गरुड; महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे निमंत्रक आकाश लामा; पूज्य भदंत राहुल बोधी महाथेरो; भदंत विरत्न थेरो; भदंत आयुपाल; भदंत शांतिरत्न; भदंत लामा; आदी अनेक मान्यवर सर्व बौद्ध संघटना आणि रिपब्लिकन गटांचे नेते उपस्थित होते.




महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी १४ ऑक्टोबर ही तारीख सर्वानुमते ठरवण्यात आली आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची धम्मदीक्षा घेऊन या देशात धम्मचक्र प्रवर्तित केले.त्यामुळे १४ ऑक्टोबर ही तारीख धम्मासाठी योगदान देण्याची तारीख असून येत्या १४ ऑक्टोबर रोजी महाबोधी महाविहार मुक्ती साठी भायखळा राणीबाग ते आझाद मैदान अशी शांततापूर्ण विराट रॅली आयोजित करण्यात आली आहे.एक दिवस धम्मासाठी देऊया आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी यंदा १४ ऑक्टोबर मुंबईत जाऊया असा निर्धार करून मुंबई ठाणे रायगड नाशिक पालघर सह राज्यभरातील बौद्ध आंबेडकरी जनतेने या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन आणि सर्व आंबेडकरी बौद्ध नेत्यांनी केले आहे.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या रॅलीला ड.प्रकाश आंबेडकर; भीमराव आंबेडकर; आनंदराज आंबेडकर यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे असे संयोजकांनी सांगितले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत ३ वाहनांसह १६.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांच्या भरारी पथक क्र. २ ने मौजे उपळाई (खु), ता. माढा येथे केलेल्या धडक कारवाईत अवैध गोवा बनावटीच्या विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या टोळीवर कारवाई करत १६ लाख २१ हजार ५४०किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १५ सप्टेंबर २०२५ रोजी खात्रीलायक गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आल्याचे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी सांगितले.

**जप्त मुद्देमालात समाविष्ट:**

– गोवा बनावटीच्या विदेशी मद्याच्या ७५० मिलीच्या १०५ बाटल्या

– १८० मिलीच्या २८८ बाटल्या

– ५०० बनावट लेबल, १८०० बनावट बुचे

– महिंद्रा बोलेरो पिकअप, मारुती सुझुकी एस-क्रॉस, टीव्हीएस ज्युपिटर मोटारसायकल

**कारवाईचे नेतृत्व:**

ही कारवाई अधीक्षक श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, प्रभारी उपअधीक्षक श्री जे. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत निरीक्षक श्री राकेश पवार, दुय्यम निरीक्षक श्री अमित नागरे, तसेच जवान योगिराज तोग्गी, नंदकुमार वेळापूरे, युवराज टेळे, आबासो कसबे, महिला जवान कल्पना जाधव यांचा सक्रिय सहभाग होता. गुन्ह्याचा तपास श्री अमित नागरे करीत आहेत.

**आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल:**

या कारवाईत अमोल दत्तात्रय फडतरे यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सप क्रमांक ८४२२००११३३ वर माहिती द्यावी : भाग्यश्री जाधव**

**विभागीय आकडेवारी:**

– एप्रिल ते सप्टेंबर २०२५ दरम्यान परराज्यातील मद्य साठा व वाहतूकविरोधात १० गुन्हे, १२ आरोपी, ९ वाहनांसह ₹७३.१४ लाखांचा मुद्देमाल

– १ ते १५ सप्टेंबर २०२५ दरम्यान १०८ गुन्हे, १०२ आरोपी, ९ वाहनांसह ₹५५.९७ लाखांचा मुद्देमाल

– जप्त मद्य व रसायन: ४०,११० लि. रसायन, ५१४० लि. हातभट्टी दारू, ९१८ लि. देशी मद्य, ८९७ लि. परराज्यातील विदेशी मद्य, ५६३ लि. ताडी

**माहिती देण्यासाठी संपर्क:**

अवैध मद्यविक्री, निर्मिती व वाहतूकविरोधात कारवाई सुरूच राहणार असून, नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे अधीक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव यांनी स्पष्ट केले.

## अनंत चैतन्य प्रशालेत हिंदी भाषा दिवस साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जन जन की भाषा है हिंदी, भारत की आशा है हिंदी, जिसने पुरे देश को जोडे रखा है, वो मजबूत धागा है हिंदी या उक्ती प्रमाणे अनेक जातीधर्म , वेगवेगळ्या बोलीभाषा बोलल्या जाणाऱ्या भारतीयांना एका माळेत गुंफून ठेवणारी एकमेव भाषा जर कोणती असेल तर ती हिंदी भाषा आहे म्हणून भारतीय संविधान सभेने १४ सप्टेंबर १९४९ रोजी हिंदी भाषेला राज्यभाषेचा दर्जा दिला तेंव्हा पासून प्रतिवर्षी हिंदी भाषेचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करण्यात यावे यासाठी, त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी हिंदी भाषा दिवस साजरा केला जातो. याच अनुषंगाने महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य.व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे राष्ट्रभाषा हिंदी दिवस साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे व पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते दक्षिण भारतात हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा याकरिता दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेची स्थापना करण्यात महत्वपुर्ण भुमिका बजावलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर प्रशालेच्या विद्यार्थिनीं कु. अंबिका जळकोटे,मानसी तळवार,सोनाली तळवार, शिवानी बाळशंकर, दिव्या निकम, संगिता धर्मसाले यांनी हिंदी भाषा का महत्त्व या विषयावर खुप सुंदर भाषण केले. यावेळी सेमी विभागाच्या चिमुकल्यांनीदेखील अतिशय सुरेख अशाप्रकारे हिंदी कविता सादर केले. यानंतर मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी भारत हा बहुभाषिक देश असून वेगवेगळ्या प्रांतात असणाऱ्या व आपापल्या मातृभाषेत बोलणाऱ्या लोकांची संपर्क भाषा म्हणून हिंदीची ओळख आहे.हिंदी भाषेचा वापर करणे म्हणजे अन्य भाषेचा तिरस्कार करणे नव्हे सगळ्या भाषेचा सन्मान आपण केला पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांनी हिंदी संत व साहित्यकांची पुस्तके वाचून ज्ञानसमृद्ध व्हावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. मोनिका सैदे हिने व सुत्रसंचालन कु. अक्सा मुल्ला हिने केले तर आभार प्रदर्शन कु.श्रृती बाळशंकर हिने मानले. या सर्व विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख व हिंदी विषय शिक्षक श्री. अप्पासाहेब काळे यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी जेष्ठ सरदार मत्तेखाने, शहाजी माने, धनंजय जोजन,सुरेश जाधव, राजेंद्र यंदे, शशीकांत अंकलगे,प्रा.रविंद्र कालीबत्ते, प्रा.काशिनाथ पाटील, अब्दुल अझीझ मुल्ला, जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, सौ. स्वप्नाली जमदाडे उपस्थित होते.या प्रशालेतील कार्यक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका मा. सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी समाधान व्यक्त केले.

## श्री. शहाजी हायस्कूल, अक्कलकोट येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ अक्कलकोट व एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० सप्टेंबर रोजी श्री. शहाजी हायस्कूल, अक्कलकोट येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

या शिबिरात ७७४ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी ११५ विद्यार्थ्यांमध्ये दृष्टीदोष असल्याचे निदर्शनास आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची वेळेत तपासणी होऊन दृष्टीविकार ओळखण्यास मदत झाली. शिबिरात नेत्रतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना




डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शनही केले. हा उपक्रम चळीीळेप छर्शीीर अंतर्गत डर्रीळपस डळसहीं, ढीरपीषीळपस डर्ळींशी या उद्दिष्टाने राबविण्यात आला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष रोटेरियन गुरूशांतप्पा पाटील, सचिव रोटेरियन प्रदीप तोरसकर, कोषाध्यक्ष रोटेरियन केदार नरोणे यांची प्रमुख भूमिका होती. शिबिरात रोटेरियन डॉ. विपुल शहा, जितेंद्र जाजू, दिनेश पटेल, मडीवलप्पा बधोळे, भिमराव तुळजापूरे, हलगोडे सागर हलगोदे, नीलकंठ कापसे, महेश जवळगी, आनंद गंदगे , डॉ. प्रशांत वाली आदी रोटेरियन व मान्यवर उपस्थित होते. शहाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. आर. एस. पाडवलकर सर, शिक्षक श्री. विकास राऊत सर व सर्व वर्गशिक्षकांनी शिबिराला सहकार्य केले. नेत्र तपासणीचे कार्य एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, पुणे येथील डॉ. सागर पवार व डॉ. क्षीरसागर यांनी केले.

### निफाड येथील कर्मवीर मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात.वाड्.मय मंडळाचे उद्घाटन

### सुप्रसिद्ध सिने अभिनेते, डॉ. राजेश आहेर यांचा नटसम्राट एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण

## भाषा आणि साहित्य हे ज्ञान व संस्कृतीचे खरे प्रतीक : अभिनेते डॉ. राजेश आहेर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. पूर्वी याच साहित्याला वाड्.मय असे म्हटले जात. हेच साहित्य खऱ्या अर्थाने मानवी संस्कार संस्कृती परंपरा ज्ञान कला कौशल्य आणि सर्व प्रकारच्या भावभावना यांचे जतन करून त्याचे पुढच्या पिढीकडे वहन व संक्रमण करण्याचे महत्त्वाचे कार्य करते. जसे आपण साहित्याचे वाचन करतो त्याचप्रमाणे कथा, कादंबरी, नाटक, कविता यांचे अभिनयातून प्रभावी सादरीकरण करणे एक खूप मोठी कला




आहे. यातूनच सिनेमा, नाटक, एकांकिका, जन्माला येऊन आजवर अनेक अजरामर भूमिकांनी लोकशिक्षणाचे व मनोरंजनाचे कार्य केले. म्हणून साहित्य आणि भाषा हे ज्ञान - संस्कृतीचे खरे प्रतीक मानले गेले आहे असे प्रतिपादन अभिनेते डॉ. राजेश आहेर यांनी केले. मविप्र समाजाचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात वाड्.मय मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

या प्रसंगी त्यांनी नटसम्राट नाटकाचे स्वतः हिंदीत भाषांतर व निर्देशन केलेली एकांकिका सादर करत, सर्वांना अंतर्मुख करत, म्हाताऱ्या आई-वडिलांचे महत्त्व आणि त्यांच्या कष्टाचे अस्तित्व पटवून दिले. यावेळी सर्व प्रेक्षकांना अश्रू अनावर झाले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी साहित्याचे व भाषेचे प्रत्येकाच्या जीवनातले स्थान आणि महत्त्व विशद केले... विद्यार्थ्यांनी फक्त डॉक्टर, इंजिनियर व व्यावसायिक न होता आपल्या आवडीनुसार साहित्यिक, लेखक, कवी, संवाद लेखक, आणि अभिनयाच्या क्षेत्रात आपल्या करिअरच्या संधी शोधाव्यात असे आवाहन केले.

**सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. राजेश आहेर यांनी मराठी सिनेमा फत्तेहशिकस्त मध्ये बाजीप्रभू देशपांडे ही महत्वाची भूमिका केली असून पानिपत, शमशेरा, फ्रिकी अली या हिंदी सिनेमात भूमिका केल्या आहेत**

**मराठी सीरियल - बाजी, मन झालं बजिंद, आंबटगोड, लक्ष्य**

**हिंदी सीरियल - तारक मेहता का उलटा चष्मा, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, शांतेच कारट, नटसम्राट, याही वळणावर, गाढवाचं लग्न, तीन पैशाचा तमाशा, वादळ निळ्या क्रांतीच......**

**नटसम्राट आदी मधुन महत्वपूर्ण भूमिकेतून अभिनय केलेला आहे**

या कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार डॉ. सुसान लॉरेन्शिया यांनी मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रोहिदास शिंदे यांनी केले, परिचय प्रा. सुनिता बोरडे यांनी केला

या कार्यक्रमासाठी डॉ. ज्ञानोबा ढगे, प्रा. योगेश कडलक, प्रा. अभय वडघुले, डॉ. सुरेखा जाधव, प्रा. नरेश सोनटक्के सर्व वरिष्ठ व कनिष्ठ विभागांचे विभाग प्रमुख व सर्व सहकारी प्राध्यापक प्राध्यापिका तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे पुरातन अलंकार गाठविण्याचे काम सुरू



## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके; नवरात्र उत्सवाच्या पूर्वतयारीसाठी अलंकार गाठविण्याचे काम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :- श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत, असे अलंकार उत्सवाप्रसंगी श्रींस परिधान करण्यात येतात. नवरात्र उत्सवाच्या पूर्वतयारीसाठी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे पुरातन अलंकार गाठविण्याचे काम सुरू करण्यात आले असल्याचेही माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

शिवकालीन, पेशवेकालीन अनेक अमूल्य दागिणे श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेस असून, यामध्ये श्री.विठ्ठलास सोन्याचे पैंजण, बाजीराव कंठी, मत्स्य, तोडे, सोवळे (धोतर), हिऱ्यांचा कंबरपट्टा, बाजुबंद, दंडपेटया, मणिबंध, सोन्याची राखी, तुळशीची सोन्याच्या मण्यांत गुंफलेली माळ, कौस्तुभमणी, हिरे, पाचूंनी गुंफलेली मोत्यांची कंठी, बोरमाळ, मोत्यांच्या माळा, पुतळ्यांच्या माळा, मोहरांच्या माळा, नवरत्नांचा हार, सोन्याचे मुकुट, हिऱ्यांचा मुकुट, सोन्याची शिंदेशाही पगडी, चांदीची काठी, सोन्याची मकरकुंडले, नील व हिरे बसवलेला नाम- म्हणजे सोन्याचा गंध असे अनेक प्रकारचे अनमोल अलंकार आहेत.

तसेच श्री रुक्मिणी मातेस सोन्याचे वाळे, पैंजण, साडी, कंबरपट्टे, माजपट्टा, रत्नजडित पेटया, हिरे, माणिक, पाटल्या, मोत्यांच्या व रत्नजडित जडावांच्या बांगडया, गोठ, तोडे, हातसर आहेत. गळ्यातील अलंकारांमध्ये कारल्याचे मंगळसूत्र, दशावतारी मंगळसूत्र, कोल्हापुरी साज, पाचूची गरसोळी, लहान सरी, मोठी सरी, पुतळ्याची माळ, मोहरांची माळ, एकदाणी, बोरमाळ, ठुशी, तुळशीचा हार, झेला, पोहे हार, चंद्रहार,चपलाहार, पेटयांचा हार, शिंदेशाही हार, तन्मणी, चिंचपेटी, नवरत्नांचा हार, शिंदे हार, जवाच्या माळा आणि हायकोल सुर्य-चंद्र असे दागिने आहेत. हिऱ्यांचे खोड असलेला तन्मणी, तारामंडल असे अनेक प्रकारचे अनमोल अलंकार आहेत.

'मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणी विराजित।'

असे अलंकाराचे वर्णन अनेक अभंगांतून संतांनी केलेले आहे.

सदरचे अलंकार जतन व सुरक्षततेच्या दृष्टीने प्रतिवर्षी गाठविण्यात येतात. सदरचे काम नवरात्र उत्सवापूर्वी करण्यात येते. त्याप्रमाणे यावर्षी सदरचे अलंकार गाठविण्याचे काम सुरू करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# निफाड एज्युकेशन फाउंडेशन श्रीराम क्लासेसला राज्यस्तरीय सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : अजिंक्य डी.वाय. पाटील युनिव्हर्सिटी पुणे आणि एज्यूकॉन टेक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र स्टेट लेव्हल कॉन्फरन्स या कार्यक्रमात निफाड एज्युकेशन न्ड सोशल फाउंडेशन या संस्थेला राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा भव्य समारंभ पुणे येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठ येथे पार पडला.

**कोचिंग क्लासेस एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड प्रा. उल्हास पाटील यांना प्रदान**

या पुरस्कार सोहळ्यात... महाराष्ट्राच्या विविध कोपऱ्यात शैक्षणिक कार्य करून समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात येतो .

या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात अजिंक्य डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश जैन तसेच आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात साहित्यिक व विचारवंत अच्युत गोडबोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी प्रा. उल्हास पाटील म्हणाले की, हा सन्मान केवळ स्वतःचा नाही, तर माझ्या सहकाऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा आणि समाजाच्या पाठिंब्या चा असून , सन्मान हा शेवट नसतो, तर नव्या जबाबदाऱ्यांचा प्रारंभ असतो. शिक्षण हीच खरी पूजा आहे, आणि विद्यार्थ्यांचं उज्ज्वल भवितव्य घडवणं हेच खरं पुण्य आहे. असे ते शेवटी म्हणाले. या पुरस्कारासाठी निफाड एज्युकेशन फाउंडेशन व श्रीराम क्लासेसच्या संचालिका सौ सविता पाटील व सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी परिवार यांची अनमोल असे सहकार्य लाभले आहे. आयोजकांनी या वेळी पुरस्काराच्या माध्यमातून शिक्षणातील उत्कृष्टता, नवकल्पना आणि समाजसेवेचा गौरव करण्याचा उद्देश व्यक्त केला

हा पुरस्कार निफाड सारख्या जिल्हास्तरीय शैक्षणिक संस्थेसाठी मोठी ओळख असून, स्थानिक स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रसारासाठी प्रेरक ठरणार आहे.

# शालेय समिती अध्यक्ष सचिन कांबळे यांच्या वाढदिवसानिमीत्त वृक्ष लागवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील लामजना ग्रामपंचायतचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य तथा जिल्हा परीषद शालेय समिती चे अध्यक्ष आ.अभिमन्यु पवार यांचे विश्वासु कार्यकर्ते मनुन संबंध तालुकाभर परीचीत असलेले सचिन कांबळे यांच्या वाढदिवसानिमीत्त पर्यावरण पुरक ग्रिन बर्थडे साजरा करण्यात आला.

यावेळी वाढदिवसाचे औचित्य साधुन लामजना जिल्हा परीषद शाळेच्या परीसरात ५१ नारळ झाडे लागवड करुन विद्यार्थ्यांना खाउ वाटप करण्यात आला .यावेळी सचिन कांबळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सर्वांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड काळाची गरज असुन झाडे लावा झाडे जगवा असा संदेश दिला , व प्रत्येकाने आपला वाढदिवस वृक्ष लागवड करुन साजरा करावा अस आवाहन केले

यावेळी उपसरपंच बालाजी पाटील .माधवराव बिराजदार. महादेव कांबळे. विनोद कारभारी. इंद्रजीत शिंदे. रफिक बिरादार. महादेव पाटील .गणेश बिराजदार .युवराज पाटील. सिद्धाप्पा आळंगे. असद पटेल. जाहेद पटेल. राम शिंदे. परमेश्वर पवार .महादेव शिंदे. कमलाकर शिंदे .जगदीश पाटील. लक्ष्मीकांत महामुनी. पाशा पटेल मधुकर कांबळे. सुलतान रसाळ परमेश्वर कांबळे .जिलानी रोजेवाले. इमरान शेख. ज्ञानोबा पवार .बालाजी शिंदे .सिराज मुल्ला. कन्हैया कांबळे .अविनाश कांबळे .दत्ता मोहिते. किशोर कांबळे .अविनाश शेळके. विकास शिंदे. पंपू दांडगोले अमरीन खजुरे .रुतुजा शेळके .नागीनी आळंगे . सह लामजना ग्रामस्थ उपस्थीत होते.




# खूपसे पाटील यांनी करमाळ्यातील कंधारमध्ये उभा केला वीस फुटी बॅनर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कुर्डू गावातील बेकायदेशीर मुरूम उपसा प्रकरणी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि आयपीएस अंजना कृष्णा यांच्या फोनवरील संवादाने हे प्रकरण महाराष्ट्रभर प्रचंड गाजले असून आरोप पत्यारोप झाले.

या प्रकरणाला पत्रकार परिषदेच्या माध्यमातून पहिल्यांदा वाचा फोडलेली जनशक्ती शेतकरी संघटनेचे अतुल खूपसे पाटील यांनी दबलेले प्रकरण मीडियाच्या समोर आणत दुग्धाभिषेक आंदोलन केले. हो गेले दहा दिवस हे प्रकरण महाराष्ट्रभर गाजत असताना आज करमाळा तालुक्यातील कंदर येथे खुपसे पाटलाच्या वतीने वीस कोटी बॅनर आयपीएस अंजना कृष्णा यांच्या समर्थनात लावलेले आहे. या बॅनर वरील मजकूर वुई सपोर्ट आयपीएस अंजना कृष्णावुई स्टॅन्ड आयपीएस अंजना कृष्णाअशी वॉक्स बॅनर वर लिहिलेली आहेत आणि अंजना कृष्णा बरोबर खूपसे पाटील यांचा फोटो पण या बॅनर वर आहे.

यावेळी बोलताना खूपसे पाटील म्हणाले, ज्याच्या नावात मारुती सयाच्या मातीचे नावअंजनातर आडनावात कृष्णासाक्षात भगवान श्रीकृष्णाचे नाव तर आयपीएस अंजना कृष्णा ह्या कशा चुकीचे असू शकतील.

यासंदर्भात करमाळा तालुक्यातील दिवसभर या बॅनर विषयी चर्चा रंगत असताना हा बॅनर सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल झाला.

यावेळी यांची कुंकुम पोलिसांना लागणे आणि पोलिसांनी स्वतःहून हा बॅनर खाली उतरवला.

यावेळी उपस्थित युवक प्रदेशाध्यक्ष गणेश भानवासे, भैया मंगवडे, कार्यकर्ते उपस्थित होते.

# किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सोनामाता प्रशालेत मार्गदर्शन शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) - आजच्या काळात किशोरवयीन मुलांसमोर शारीरिक, मानसिक व सामाजिक अशा विविध आव्हानांचा सामना करण्याची वेळ येते. या पार्श्वभूमीवर मुलांना योग्य मार्गदर्शन मिळावे या हेतूने लिमयेवाडी येथील सोनामाता प्रशाला येथे प्रिसिजन फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'सर्वंकष लैंगिकता शिक्षण शिबीराचे' आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना किशोरावस्था, वैयक्तिक स्वच्छता, आहार, एचआयव्ही/एड्स, मासिक पाळी, कॅन्सर, जीवनकौशल्ये, बालशोषण प्रतिबंध तसेच गुड टच-बॅड टच यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, सहायक जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे, एफपीआयचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, अध्यक्ष प्रा. डॉ. एन. बी. तेली व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. यामध्ये एफपीआयचे कार्यक्रम अधिकारी विरेंद्र परदेशी, स्वप्निल सोनवणे, सत्यभामा कांबळे, उर्मिला बनसोडे व विकी शिवशरण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी सायबर क्राईम या विषयावर पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी लोणी व पोलीस कॉन्स्टेबल सचिन अंबलगी यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे म्हणजे काय? हॅकिंग , फिशिंग, बँकिंग फसवणूक, सायबर दहशतवाद, ऑनलाइन फ्रॉड, गेमिंगचे दुष्परिणाम, सोशल मीडियाचा गैरवापर इत्यादींबाबत सखोल माहिती दिली तर सखी वन स्टॉप सेन्टर यांच्यावतीने लिंगभेद आधारित हिंसाचार या विषयावर समुपदेशीका सुजाता बत्तुल, ड. रेखा गोटीपामुल यांनी माहिती दिली.

तसेच कार्यशाळेदरम्यान सापशिडीचा खेळ व प्रश्नोत्तर सत्रांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले शंका निरसन केले. तसेच विद्यार्थ्यांची मोफत हिमोग्लोबिन तपासणीही करण्यात आली. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक विनोद शिंदे, सुवर्णा अत्रे, शिक्षकवृंद व




**सायबर क्राईम याविषयी मार्गदर्शन करताना अश्विनी लोणी, सचिन अंबलगी, विनोद शिंदे, सुजाता बत्तुल, ड. रेखा गोटीपामुल आदी दिसत आहेत.**

कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना जीवनासाठी आवश्यक ज्ञान व योग्य दृष्टीकोन मिळाल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले.

**मराठ्यांना दिलेलं ओबीसी मधून आरक्षण हे कोर्टासमोर टिकणार नाही**

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तयारी करा : सुजात आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ विशेष प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक स्वबळावर लढवत असून, निवडणुकीची तयारी करा असे आव्हान एल्गार मेळाव्यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

पुढे बोलताना म्हणाले, निवडणूक आयोगाने साडेपाच नंतरच्या मताची आकडेवारी जाहीर करावी, आकडेवारी जाहीर करायला अडचण तरी काय? असा सवाल उपस्थित केला. आंबेडकरी समूहाच्या आणि आंबेडकरी चळवळीतल्या कार्यकर्त्यांवरती अन्याय अत्याचार झाल्यास पाठीमागे आंबेडकर घराणं आहे असेही ते यावेळेस बोलायला विसरले नाही? येणाऱ्या काळात ताकतीने

निवडणूक लढवून आपली ताकद दाखवा असे आव्हान युवकासमोर केले, भाजप आणि काँग्रेस एका नाण्याच्या दोन्ही बाजू आहेत हे डोळ्यासमोर आणि समाजासमोर येणं काळाची गरज आहे त्यासाठी युवकांनी जनतेला दाखवून द्यावे असेही प्रतिपादन केले. मराठ्यांना दिलेलं, ओबीसी मधून आरक्षण हे, कोर्टासमोर टिकणार नाही, हे मात्र ठणकावून सुजात आंबेडकर यांनी जाहीर केले,

> **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, ओबीसी हा भाजपचा डीएनए आहे. त्याच देवेंद्र फडणवीस यांनी कागदावर मराठा समाजाला ओबीसीच्या कोट्यामधून आरक्षण दिले. दुसऱ्या बाजूला सर्व राजकीय पक्ष मराठा आरक्षणाला पाठिंबा देताय पण, ओबीसींच्या ताटातून आरक्षण जातंय, त्यावर कोणीही बोलत नाहीये. वंचित बहुजन आघाडी हा एकमेव पक्ष आहे की, जो भूमिका घेतोय आणि सांगतोय की, गरीब मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे पण, ओबीसींच्या ताटातून नाही. ओबीसी-मराठा आरक्षणाचे ताट वेगळे ठेवा.**
>
> **- सुजात आंबेडकर (युवा नेते, वंचित बहुजन आघाडी)**

यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य, डॉ नितीन ढेपे, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सोमनाथ साळुंखे, अक्कलकोटच्या स्थानिक

राजकारणावरती प्रकाश टाकत सोमनाथ साळुंखे यांनी उपस्थित यांचे लक्ष वेधून घेतले. राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉक्टर नितीन ढेपे यांनी बोलताना म्हणाले आरक्षणाचा मुद्दा हा, सार्वजनिक झाला असून ओबीसींना, आपल्या आरक्षणाची जाणीव होणं काळाची गरज आहे, असे

मत व्यक्त केले. यावेळी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी पक्षाची भूमिका मांडली स्वाभिमानी आंबेडकरी विचाराचे आम्ही चालू केले असून मी मेल तरी स्वाभिमान सोडणार नाही माझं काम आंबेडकर घराण्याच्या स्वाभिमानी पक्ष असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या कामासाठी लढत राहू व येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणूक स्वबळावर लढून आमची ताकत दाखवू असे म्हणाले.



> **ओबीसी समाज संकटात सापडला असताना, ओबीसी समाजाच्या मदतीला, न्याय देण्यासाठी बाळासाहेब आंबेडकर हे धावून आले, त्यासाठी रस्त्यावर उतरले. इतर राजकीय पक्षांचे नेते कधीच तुमचं आरक्षण वाचवू शकत नाही. हे सर्व पक्ष आरक्षणविरोधी आहेत. देशात मंडल आयोग लागू करण्यात बाळासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान आहे, हे विसरू नका.**
>
> **- प्रा. सोमनाथ साळुंखे (राज्य उपाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी)**

सभेचे प्रास्ताविक युवा अध्यक्ष शिलामनी बनसोडे यानी केले. उद्योजक व नेते संतोष इंगळे, विद्यार्थी नेते, रवी पोटे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

शहराध्यक्ष विशाल ठोंबरे,यासह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, व आभार साहिल कांबळे यांनी केले, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते